पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी - ४११ ०१८.

**मा.विधी समिती**

कार्यपत्रिका क्रमांक - ३

**सभावृत्तांत**

दिनांक - **२०/०८/२०१४** वेळ - दुपारी **१२.००** वा.

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा.विधी समितीची विशेष सभा बुधवार दिनांक **२०/०८/२०१४** रोजी दुपारी **१२.००** वाजता महापालिकेच्या प्रशासकीय इमारतीमधील महापौर मधुकरराव रामचंद्र पवळे सभागृहात आयोजित करणेत आली होती. सभेस खालील सन्मा. सदस्य उपस्थित होते.

१) **मा. पालांडे सुजाता सुनिल – सभापती**
२) मा. वसंत (नाना) आनंदराव लोंढे
३) मा. वाबळे संजय मल्हारराव
४) मा. सौ.ठाकरे मंदाकिनी अर्जुन
५) मा. वाघेरे प्रभाकर नामदेव
६) मा. सौ.बनसोडे शकुंतला काशिनाथ
७) मा. मासुळकर समीर मोरेश्वर
८) मा. विमलताई सुरेश जगताप

याशिवाय मा.गावडे, मा.डॉ.डोईफोडे - सहा.आयुक्त, मा.उल्हास जगताप - नगरसचिव, मा.निकम, मा.पिरजादे, मा.दांगट, मा.कांबळे - कार्यकारी अभियंता, मा.पाटील - प्रशासन अधिकारी (आस्था) हे अधिकारी सभेस उपस्थित होते.

----------

ठराव क्रमांक : १९ विषय क्रमांक : १
दिनांक : २०/०८/२०१४ विभाग : प्रशासन
सुचक : मा.वसंत लोंढे अनुमोदक : मा.समीर मासुळकर
संदर्भ : मा.महापालिका आयुक्त यांचेकडील पत्र क्र.प्रशा/७/कावि/१०२८/२०१३, दि.१७/१०/२०१३

विषय - पिंपरी चिंचवड महानगरपालिका सेवा (सेवाभरती व सेवांचे वर्गीकरण) नियम २०१३ बाबत.

विषय क्रमांक १ चा विचार पुढील सभेचे वेळी करणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक : २० विषय क्रमांक : २

दिनांक : २०/०८/२०१४ विभाग : प्रशासन

सुचक : मा.अरुण बो-हाडे अनुमोदक : मा.संजय वाबळे

संदर्भ : मा.महापालिका आयुक्त यांचेकडील पत्र क्र.प्रशा/७/कावि/१०२९/२०१३, दि.१७/१०/२०१३

विषय - पिंपरी चिंचवड महानगरपालिका विभागांतर्गत आस्थापनेवरील सर्व पदांचा आढावा घेऊन नविन पदांच्या पद निर्मितीबाबत...

विषय क्रमांक २ चा विचार पुढील सभेचे वेळी करणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक : २१ विषय क्रमांक : ३

दिनांक : २०/०८/२०१४ विभाग : स्थापत्य क प्रभाग

सुचक : मा.प्रभाकर वाघेरे अनुमोदक : मा.मंदाकिनी ठाकरे

संदर्भ : १) मा.महापालिका आयुक्त यांचेकडील पत्र क्र.स्था/कमु/३२१/२०१४, दि.१८/०३/२०१४

२) मा.कार्यकारी अभियंता, क प्रभाग यांचेकडील दि.२०/०८/२०१४ चे पत्र.

**विषय -** प्रभाग क्र.१०१ फुगेवाडी मधील लोकमान्य टिळक शाळेच्या जुन्या इमारतीत फेरफार करुन नविन शाळा इमारत बांधणे व स्थापत्य विषयक अनुषंगिक कामे करणेकामी (सुधारित प्रशासकीय मान्यता)

उपरोक्त संदर्भिय पत्र क्र.२ अन्वये विषयपत्र मागे घेणेबाबत केलेली विनंती मान्य करुन विषय क्र.३ कामीचा मा.आयुक्त यांचा प्रस्ताव त्यांनी मागे घेणेस त्यांस परवानगी देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक : २२ विषय क्रमांक : ४

दिनांक : २०/०८/२०१४ विभाग : अ प्रभाग कार्यालय

सुचक : मा.संजय वाबळे अनुमोदक : मा.शकुंतला बनसोडे

संदर्भ : १) मा.प्रशा.अधि.तथा सचिव अ प्रभाग यांचेकडील पत्र क्र.अप्र/११/कावि/११२/२०१४, दि.२५/०३/२०१४

मा. अ प्रभाग समिती ठराव क्रमांक ८ दिनांक १८/०२/२०१४ नुसार पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या अप्पूघर शेजारील समर्थनगरी, आशिर्वाद नगर, परमार कॉम्प्लेक्स येथील तसेच दत्तनगर भागातील नागरीक पालिका हद्दीबाहेरील असले तरी महापालिकेने त्यांच्या पाण्याची सोय केलेली आहे. पण त्याचा दर १००० लिटरला ३५/- रु. असा आहे. परंतु सिध्दीविनायक नगरी हा भाग सुध्दा मनपा हद्दीबाहेर आहे पण तेथील पाण्याचा दर १००० लिटरला २.५० रु. महापालिकेच्या अटी शर्ती नुसार आहे. याबाबत मा.विधी समिती ठराव क्र.९३४ दिनांक ०३/०४/२००६ अन्वये मा.महापालिका सभेकडे शिफारस केलेली असून मा.महापालिका सभा ठराव क्र. ५०८ दि.२४/०४/२००६ अन्वये सिध्दीविनायक व श्रीनगरी येथील नागरिकांना मनपा हद्दीतील निवासी दराप्रमाणे पाणीबील आकारणेस मान्यता देणेत आलेली आहे. तरी अप्पूघर शेजारील समर्थनगरी, आशिर्वाद नगर, परमार कॉम्प्लेक्स येथील तसेच दत्तनगर भागातील रहिवाशांना सिध्दीविनायक नगरी व श्रीनगरी येथील

मनपा हद्दीतील निवासी दराप्रमाणे पाणीबील आकारणेस मान्यता देणेकामी मा.महापालिका सभेकडे शिफारस करणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पाहता ठराव मा.महापालिका सभेकडे पाठविणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक : २३ विषय क्रमांक : ५

दिनांक : २०/०८/२०१४ विभाग : अ प्रभाग कार्यालय

सुचक : मा.संजय वाबळे अनुमोदक : मा.शकुंतला बनसोडे

संदर्भ : १) मा.महापालिका आयुक्त यांचेकडील पत्र क्र.स्था/का.अ./बीआरटीएस/२०४/२०१४,दि.०२/०५/२०१४

२) मा.कार्यकारी अभियंता, बीआरटीएस यांचे दि.२०/०८/२०१४ चे पत्र.

**विषय -** देहू आळंदी रस्ता साखळी ०/०० ते ८/२५० देहू कमान ते (मोशी जाधववाडी हद्दीच्या रस्त्यापर्यंत ३० मी. डी.पी.प्रमाणे उर्वरित कामे करणे.)

उपरोक्त संदर्भिय पत्र क्र.२ अन्वये विषयपत्र मागे घेणेबाबत केलेली विनंती मान्य करून विषय क्र.५ कामीचा मा.आयुक्त यांचा प्रस्ताव त्यांनी मागे घेणेस त्यांस परवानगी देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक : २४ विषय क्रमांक : ६

दिनांक : २०/०८/२०१४ विभाग : फ क्षेत्रीय कार्यालय

सुचक : मा.शकुंतला बनसोडे अनुमोदक : मा.प्रभाकर वाघेरे

संदर्भ : मा.महापालिका आयुक्त यांचेकडील पत्र क्र.स्था/फक्षेका/काअ/कावि/४९३/२०१४, दि.०४/०८/२०१४

मा.महापालिका आयुक्त यांची शिफारस विचारात घेऊन -

प्रभाग क्र.५ मध्ये अतिक्रमण कारवाईसाठी क्रेन व जे.सी.बी. पुरविणेकामी येणा-या अंदाजे र.रु.१७,००,२४०/- (अक्षरी र.रु. सतरा लाख दोनशे चाळीस फक्त) चे खर्चाचे पुर्वगणनपत्रकास सुधारित प्रशासकीय मान्यता व त्याप्रमाणे काम करणेस तसेच प्रभाग क्र.५ मध्ये अतिक्रमण कारवाईसाठी क्रेन व जे.सी.बी.पुरविणे कामीचे अंदाजे र.१७,००,२४०/- चे खर्चास मान्यता द्यावी व सदरचे काम संपूर्ण फ प्रभाग कार्यक्षेत्रासाठी करण्यास मान्यता देणेबाबत मा.महापालिका सभेकडे शिफारस करणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पाहता ठराव मा.महापालिका सभेकडे पाठविण्यात यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक : २५ विषय क्रमांक : ७

दिनांक : २०/०८/२०१४

सुचक : मा.प्रभाकर वाघेरे अनुमोदक : मा.संजय वाबळे

संदर्भ : मा.प्रभाकर वाघेरे, मा.संजय वाबळे यांचा प्रस्ताव -

मा.महापालिका सभेच्या दिनांक २०/०५/२०१४ च्या सभेतील ठराव क्रमांक ४७९ नुसार महानगरपालिकेच्या संपूर्ण अंदाजपत्रकास अंदाजपत्रकीय रकमेसाठी मान्यता देण्यात आलेली आहे. परंतु ब क्षेत्रीय कार्यालय पाणीपुरवठा विभागातील प्रस्तावात नमुद प्रपत्रातील कामांचे पुढे

अंदाजपत्रकीय रक्कम छापण्यात आलेली नसल्याने या कामांना प्रशासकीय मान्यता देणे आवश्यक आहे. तरी प्रस्तावा सोबतचे प्रपत्रात नमुदप्रमाणे कामांचे नावापुढे दर्शविणेत आलेल्या अंदाजपत्रकीय रकमेस प्रशासकीय मान्यता देणेत येत आहे. (कामाची अंदाजपत्रकीय एकूण र.रु.२,९३,००,०००/-)(सन २०१४-१५ चा अंदाज र.रु.१,७९,००,०००/-) तसेच प्रभाग क्र.४३ पिंपरीनगर येथे आवश्यकतेनुसार संडासब्लॉक व मुता-या बांधणेचे काम (नि.क्र.११/१७/२०१३-१४) स्थापत्य ड मुख्यालयामार्फत सुरु आहे. तथापि सद्यस्थितीत नविन संडासब्लॉक बांधणेसाठी साईट उपलब्ध नसल्याने या कामातून याच प्रभागामध्ये स्थापत्य विषयक इतर कामे उदा.कॉंक्रीट पेव्हींग ब्लॉक बसविणेसाठी इ.कामे करणेसाठी मान्यता देण्यात येत आहे. तसेच पिंपरी वाघेरे घाट नं.१ ब येथील उद्यान विकसित करणे व त्याची तीन वर्षाकरिता देखभाल करणे रु.५ लक्ष प्रत्येक वर्षाकरिता असे तीन वर्षाकरिता १५ लक्ष सदर कामासाठी तरतूद उपलब्ध नसून सदरची तरतूद उद्यान विभागाकडील अर्थशिर्षातून खात्याने वर्ग करावी. सदर उद्यानाच्या देखभाल दुरुस्तीसाठी दरवर्षी रु.५.०० लक्ष इतका खर्च येतो. सन २०१२-१३ व २०१३-१४ या वर्षामध्ये देखभालीच्या कामाचे देयक मिळाले नसून ते मिळण्याकरीता (१५ लक्ष) तरतूद वर्ग करणे आवश्यक आहे. म्हणजे दोन वर्षाकरिताचे देयक संबंधित ठेकेदारास देता येईल. तरी तरतूद वर्गीकरणास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक : २६ विषय क्रमांक : ८

दिनांक : २०/०८/२०१४

सुचक : मा.समीर मासुळकर अनुमोदक : मा.प्रभाकर वाघेरे

संदर्भ : मा.समीर मासुळकर, मा.प्रभाकर वाघेरे यांचा प्रस्ताव -

स्थापत्य विभागातील कार्यकारी अभियंता पदाच्या रिक्त जागांवर सध्याच्या कार्यकारीअभियंत्यांना अतिरिक्त पदभार देण्यात आलेला आहे. कामकाजाच्या सोईच्यादृष्टीने उपअभियंता स्थापत्य पदावरील खालील सेवाजेष्ठ अभियंत्यांना १)श्री.औंभासे प्रमोद सुधाकर, २)श्री.गायकवाड जीवन कृष्णा, ३) श्री.फारुक शेख, ४) श्री.सोनवणे डी.एस. यांना कार्यकारी अभियंता पदावर पदोन्नती देणेस, कार्यकारी अभियंता पदास शासनाची मंजूरी प्रलंबित असल्यास शासनाची मंजूरी मिळेपर्यंत वरील सेवाजेष्ठ उपअभियंत्यांस कार्यकारी अभियंता पदाचा पदभार देणेस मान्यता देणेत येत आहे. तसेच महानगरपालिकेमध्ये विद्युत दुरध्वनी कक्ष (दुरसंचार) विभागाकडे तांत्रिक सेवेतील "दुरध्वनी पर्यवेक्षक" या अभिनामाचे वर्ग ३ मधील १ पद पदोन्नतीने भरणेकामी मंजूर आहे. सदर पदासाठी वेतनबॅण्ड र.रु.९३००-३४८०० ग्रेड पे ४३०० मंजूर आहे. "दुरध्वनी चालक" संवर्गामध्ये, "दुरध्वनी चालक" पदानंतर पदोन्नती सोपान "दुरध्वनी पर्यवेक्षक" हे पद पदोन्नती साठी रिक्त असल्याने व आतापर्यंत "दुरध्वनी चालक" या पदावर एस.एस.सी. (इयत्ता १० वी) उत्तीर्ण झालेल्या व टेलिफोन ऑपरेटर कोर्स शासनमान्य संस्थेमधून उत्तीर्ण झालेल्या कर्मचा-यांची महापालिकेमध्ये नियुक्ती केलेली आहे. "दुरध्वनी पर्यवेक्षक" पदासाठी शैक्षणिक अर्हता व पात्रता १)एस.एस.सी. (इयत्ता १० वी) उत्तीर्ण किंवा मान्यताप्राप्त विद्यापिठाचा कोणत्याही शाखेचा पदवीधर. २) शासन मान्य संस्थेतील टेलिफोन ऑपरेटर कोर्स उत्तीर्ण, ३) टेलिफोन, ई.पी.ए.बी.एक्स व संबंधित उपकरणाचे प्राथमिक तांत्रिक ज्ञान आवश्यक, ४) "दुरध्वनी चालक" पदावर १५ वर्षाचा अनुभव असणा-या महानगरपालिकेतील कर्मचा-यांना सेवाजेष्ठतेनुसार व गुणवत्तेचा विचार करुन. वरील प्रमाणे "दुरध्वनी पर्यवेक्षक" पदासाठी महापालिकेच्या सेवाप्रवेश नियम समिती निश्चित केलेल्या शैक्षणिक अर्हता व पात्रतेच्या प्रस्तावास मान्यता देणेत येत आहे.

तसेच प्रस्तावात नमुद लिपिक पदासाठी आवश्यक ती अर्हता धारण करणारे कर्मचारी वर्ग ४ मध्ये आहेत. तसेच सामान्य प्रशासन विभाग यांचेकडील अधिसूचना दिनांक ३१ मे २००६ नुसार शासन आदेश क्र.एएससी १५१४/प्र.क्र.९७/२०१४/१४-अ तारीख २१ जुलै २०१४ नुसार गट ड संवर्गामधील कर्मचा-यांना लिपिक - टंकलेखक पदावर नियमित स्वरुपात ड वर्गातील कर्मचारी यांना पदोन्नती देण्यास मान्यता देण्यात येत आहे. तसेच पिंपरी चिंचवड महानगरपालिकेमध्ये प्रशासन अधिकारी अभिनामाची ८ पदे भरणेसाठी दिनांक ०५/१०/२०१३ रोजी लेखी परिक्षा व मुलाखती घेण्यात येऊन पात्र उमेदवारांची निवड यादी करण्यात आली आहे. यादीवरील ८ उमेदवारांना प्रशासन अधिकारी पदावर नियुक्ती देण्यात आलेली आहे. या यादीमध्ये महानगरपालिकेत प्रशासकीय संवर्गात २० वर्षापेक्षा जास्त सेवा झालेले श्री.अनिल लक्ष्मण खामकर, श्री.प्रवीण सोपानराव बागलाणे व श्री.रमेश भिकाजी चोरघे, यांचा सामावेश असून ते गुणानुक्रमे वरिष्ठ स्थानावर आहेत. त्यामुळे ते प्रशासन अधिकारी तथा गट ब मधील प्रशासन अधिकारी पदाचे समकक्ष पदावर नियुक्ती देण्यास पात्र आहेत. मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ तथा महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम  मधील अनुसूची ड, प्रकरण ३ मध्ये एखाद्या पदाची अर्हता धारण करणारे कर्मचारी उक्त पदावर नेमणूक देण्यास योग्य असेल असे महापालिकेचे मत असेल तर महापालिकेस जाहिरात देऊन पद भरण्याची पध्दत न अनुसरता अशा कर्मचा-यांस नेमणूक करता येईल अशी तरतुद आहे. तसेच मे.मुंबई उच्च न्यायालयाने रिट पिटीशन क्रमांक १२९० दिनांक २५/०४/२००७ अन्वये उक्त अधिनियमातील तरतुदीनुसार पुणे महापालिकेमध्ये, महापालिका सेवेत नसलेल्या उमेदवारास दिलेली नियुक्ती रद्द करुन महापालिका सेवेतील कर्मचा-यांस नेमणूक देणेबाबत आदेश दिलेला आहे. पुणे मनपाने त्याप्रमाणे कार्यवाही केलेली आहे. तथापि महापालिका प्रशासनाने महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील सदर तरतुदीचा विचार न करता प्रशासन अधिकारी पदनामाची ८ पदे भरलेली आहेत. मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ तथा महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम  मधील अनुसूची ड, प्रकरण ३ मधील तरतुदीनुसार तसेच मे.मुंबई उच्च न्यायालयाने रिट पिटीशन क्रमांक १२९० दिनांक २५/०४/२००७  अन्वये दिलेल्या निकालाचा विचार करुन दिनांक ०५/१०/२०१३  रोजीचे प्रशासन अधिकारी पदाचे यादीवरील प्रशासन अधिकारी पदावर नियुक्ती देण्यास पात्र असलेले श्री.अनिल लक्ष्मण खामकर यांचा प्रशासकिय व लेखा संवर्गातील प्रशासन, एल.बी.टी. व मुलेप विभागातील वर्ग २ व ३ चे पदावरील कामाचा २४ वर्षाचा अनुभव विचारात घेऊन त्यांना प्रशासन अधिकारी पदाचे समकक्ष गट ब मधील भांडार नियंत्रक पदावर, श्री.प्रवीण सोपानराव बागलाणे यांचा प्रशासकिय लेखा, जकात, विद्युत व जनसंपर्क विभागातील वर्ग ३ चे पदावरील कामाचा २३ वर्षाचा अनुभव विचारात घेऊन त्यांना प्रशासन अधिकारी पदाचे समकक्ष गट ब मधील मुख्य आयातकर अधिक्षक पदावर, श्री.रमेश भिकाजी चोरघे, यांचा प्रशासकिय संवर्गातील प्रशासन, जकात, निवडणूक व संगणक विभागातील वर्ग ३ चे पदावरील कामाचा २३ वर्षाचा अनुभव विचारात घेऊन त्यांना प्रशासन अधिकारी पदाचे समकक्ष गट ब मधील विशेष अधिकारी पदावर नियुक्ती देणेस मान्यता देणेकामी मा.महापालिका सभेकडे शिफारस करणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पाहता ठराव मा.महापालिका सभेकडे पाठविणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक : २७ विषय क्रमांक : ९

दिनांक : २०/०८/२०१४

सुचक : मा.संजय वाबळे अनुमोदक : मा.प्रभाकर वाघेरे

संदर्भ : मा.अरुण बो-हाडे, मा.संजय वाबळे यांचा प्रस्ताव -

विषय - प्रभाग क्र.६ मोशी येथील प्रस्तावात नमुद केलेल्या कामांना सुधारित तरतुदीप्रमाणे सुधारित प्रशासकीय मान्यता मिळणेबाबत....

विषय क्रमांक ९ चा विचार पुढील सभेच्यावेळी करणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

यानंतर मा.सभापती यांनी सभा संपल्याचे जाहिर केले.

( **पालांडे सुजाता सुनिल** )
**सभापती**
विधी समिती
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - ४११ ०१८.

पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी १८. नगरसचिव कार्यालय
क्रमांक : नस/४/कावि/७०३/२०१४
दिनांक : २६/०८/२०१४

**नगरसचिव**
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी ४११ ०१८.

प्रत : सर्व संबंधित शाखाप्रमुख व शाखाधिकारी यांचेकडे पुढील योग्य त्या कार्यवाहीसाठी रवाना.

\\172.16.0.152\e\e drive\Nagersachiv1\Vidhi-14-15\proceeding 3_Vidhi.doc